**विदर्भ विकास महामंडळाचा सन २०२४-२५ चा ५४ वा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे विधानमंडळास सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे खालील प्रमाणे आहेत :-**

- विदर्भ विकास महामंडळ, मर्यादित, नागपूर यांचा सन २०२४-२०२५ चा ५४ वा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे तयार करुन तो दि. ०८.०८.२०२५ रोजी संचालक मंडळाकडून स्विकृत करण्यात आला.

- सदर वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल महालेखाकार (वाणिज्यिक लेखापरीक्षा), मुंबई यांना अभिप्रायासाठी दि. ०७.१०.२०२५ रोजी पाठविण्यात आला.

- सदर अहवालावर महालेखाकार (वाणिज्यिक लेखापरीक्षा), मुंबई यांचेकडून दि. ०६.०१.२०२६ रोजी अभिप्राय प्राप्त झाले.

- विदर्भ विकास महामंडळ, मर्यादित, नागपूर यांच्या दि. ०६.०२.२०२६ रोजी आयोजित भागधारकांच्या सभेमध्ये सन २०२४-२०२५ च्या वार्षिक अहवालास व त्यावरील भारताच्या नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अभिप्रायास मान्यता दिलेली आहे.

- त्यानंतर दि. ०९.०२.२०२६ रोजी सदर वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल (इंग्रजी व मराठी) छपाईसाठी पाठविण्यात आला.

- कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम ३९५/१(ब) मधील तरतूदीनुसार विदर्भ विकास महामंडळाचा सन २०२४-२०२५ चा ५४ वा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे विधानमंडळास सादर करण्याकरीता दि. २५.०५.२०२६ (प्राप्त दि.०९.०६.२०२६) रोजी शासनास सादर करण्यात आलेले आहेत.

त्यामुळे अहवाल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात विहित मुदतीत सादर करता आलेला नाही. हा विलंब क्षमापित करुन सदर अहवाल महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यास अनुमती द्यावी, ही विनंती.

(अजित सासुलकर)
उप सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन

एच ३५६-५